दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, २२ जून २०२६ | वर्ष - १ | अंक -२६७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

**२२ जून २०२६, सोमवार**
वार: सोमवार माह: ज्येष्ठ (अमावस्यांत) तिथी: शुक्ल पक्ष, अष्टमी (दुपारी ०३:३९ पर्यंत) शुभ आणि अशुभ वेळा (पुणे) राहुकाळ: सकाळी ०७:२३ ते ०९:०४ पर्यंत अमृत काळ: उपलब्ध नाहीअभिजीत मुहूर्त: दुपारी १२:०० ते १२:५२ पर्यंत

### कुटुंब नियोजनाचा भार महिलांवरच

**पुणे :** कुटुंब नियोजनासाठी पुरुषांची नसबंदी ही महिलांच्या तुलनेत अधिक सोपी, सुरक्षित आणि कमी वेळेत होणारी शस्त्रक्रिया मानली जाते. मात्र राज्यात आजही या जबाबदारीचा बहुतांश भार महिलांवरच पडत असल्याचे चित्र समोर आले आहे. २०२५-२६ या वर्षात राज्यात झालेल्या एकूण २ लाख ८१ हजार कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांपैकी तब्बल दोन लाख ७५ हजार शस्त्रक्रिया महिलांच्या तर केवळ ६ हजार ४६२ शस्त्रक्रिया पुरुषांच्या झाल्या आहेत.

# पावसाळी अधिवेशन वादळी होणार!

## 'मविआ' एकत्र, 'ते' १३ मुद्दे मांडत सरकारची कोंडी, मास्टर प्लॅन तयार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन उद्या (सोमवार) पासून सुरू होत आहे. या अधिवेशनाच्या पूर्व संध्येला चहापान कार्यक्रमाचे निमंत्रण विरोधी पक्षाला प्राप्त झाले होते. मात्र, विरोधी पक्षाने या चहापानवर बहिष्कार टाकला आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी एकत्र पत्रकार परिषद घेत राज्यावर दुष्काळाचे सावट, भीषण पाणी टंचाई, शेतक-यांना फसवी कर्जमाफी, शेतकरी आत्महत्येत वाढ, ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, इंधन तुटवडा, महागाई, नीट पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांवर अन्याय या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे.

महाविकास आघाडीने सरकारला पत्र लिहून तब्बल १३ मुद्दे मांडत सरकारीच कोंडी केली आहे. पहिल्या मुद्दा हा दुष्काळाचा असून त्यामध्ये म्हटले आहे की, राज्यात पाऊस लांबल्यामुळे दुष्काळाची परिस्थीती निर्माण झाली असून शासनाचे पाण्याचे नियोजन चुकलेले आहे. राज्यातील धरणात आज फक्त २३.५४ टक्के पाणी साठा शिल्लक आहे. पेरण्या खोळंबल्या आहेत. सरकार मात्र खासदार, आमदार फोडण्यात व्यस्त आहे आणि शेतकरी उध्वस्त झाला आहे.



**कांद्याला भाव मिळत नाही...**

शेतकऱ्यांच्या कांद्याला बाजारात कवडीमोल भाव मिळत आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी त्रस्त आहेत. ग्राहकांना मात्र हाच कांदा २५ रुपये किलोने मिळत आहे. नाशिकच्या सटाणा कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्याला ५० पैसे किलो दर मिळाला. सोलापूरमध्ये एका शेतकऱ्याने ७३ गोणी कांदा विकला, पण त्याच्या हातात फक्त ४०० रुपये आले. नाफेडने कार्यक्षेत्राबाहेरील संस्थांनाही खरेदी केंद्रे दिली आहेत. या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच, कांद्याचे दर कोसळल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष असून, सरकारने तातडीने हस्तक्षेप करून नाफेडमार्फत मोठ्या प्रमाणावर खरेदी करावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे, असे सांगत तिसऱ्या मुद्दात कांदा प्रश्न मांडला आहे.

**ढासळलेली कायदा व सुव्यवस्था**

राज्यात दर ५३ मिनिटांनी एका चिमुकलीवर अत्याचार, दररोज २७ चिमुकल्यांवर बलात्कार होतात. नसरापूरची चिमुकली न्याय मागत आहे. सन २०२६ मध्ये पहिल्या चार महिन्यात ३,२७९ पॉक्सो गुन्हे दाखल झालेले आहेत, असे सांगत अशोक खरात प्रकरण शालार्थ आयडी घोटाळा टीसीएस धर्मांतर व शोषण प्रकरण

त्र्यंबकेश्वर दर्शन पास घोटाळा म्हाडा भूखंड घोटाळा महिला अत्याचार प्रकरण हे प्रशासनातील भ्रष्टाचार, राजकीय संरक्षण आणि कायदा-सुव्यवस्थेच्या अपयशाचे गंभीर संकेत आहे, असे चौथ्या मुद्यात म्हटले आहे

आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याचा फटका राज्याला बसला आहे. आता आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाचे दर कमी झाले तरी सरकारने सामान्य नागरीकांना दिलासा दिलेला नाही. शेतकरीविरोधी गरज नसलेला 'शक्तीपीठ महामार्ग केवळ कंत्राटदारांचे भले करण्यासाठी हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या गळ्यावर सुरी फिरवत आहे, लाडक्या बहिणींना ठरवले अपात्र,महाराष्ट्राच्या दैवतांचा, महापुरुषांचा वारंवार अपमान,बेसुमार वृक्षतोड, 'नीट' परीक्षा पेपरफुटी,कोकणातील आंबा बागायतदार संकटात तसेच कोकणातील इतर समस्या, विरोधी पक्षनेते पदाची नियुक्ती अशा विविध प्रश्नांकडे मविआने पत्रात सरकारचे लक्ष वेधले आहे.

राज्यावर दुष्काळाचे संकट आहे.पेरण्या लांबला आहेत, शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहे. सरकारने सुका दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी शिवसेनेचे गटनेते भास्कर जाधव यांनी पत्रकार परिषदेत केली. सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही फसवी असून त्यात शेतकऱ्यांना अटी शर्तींमध्ये अडकवण्यात आले आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करावा अशी मागणी महाविकास आघाडीने यावेळी केली.

विधान परिषदेचे काँग्रेस गटनेते सतेज पाटील यांनी,हे सरकार ५६ टक्के कमिशन सरकार असल्याची टीका केली. राज्यात कंत्राटदारांनी अधिवेशन घेऊन कामांची बिले मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कमिशन द्यावे लागत असल्याचे सांगितले. कंत्राटदारांची तब्बल एक लाख कोटी रुपयांहून अधिक बिले प्रलंबित आहेत. जल जीवन मिशनच्या निधीत कपात झाली असून अनेक विकासकामे रखडली आहेत. दुसरीकडे राज्यावरील कर्जाचा बोजा साडेनऊ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे अशी टीका सतेज पाटील यांनी केली.

### फसवी शेतकरी कर्ज माफी

**दुसऱ्या मुद्द्यात शेतकरी कर्जमाफी फसवी असल्याच्या म्हटले आहे. पत्रात सांगितले आहे की, महायुती सरकारने मोठ्या गाजावाजात २ लाख रुपयांपर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची घोषणा केली. निवडणुकीत शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करू असे आश्वासन दिले. पण आता प्रत्यक्ष ऋढ समोर आल्यानंतर लक्षात येत आहे की शेतकरी कर्जमाफी ही रजाकार पध्दतीची आहे. कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी कमी आणि अटी-शर्तींचा सापळा जास्त आहे. दतीचा हात देण्याऐवजी सरकारने अटींची भिंत उभी केली आहे. शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळा आण ७/१२ कोरा करा, अशी मागणी केली आहे.**

राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील म्हणाले राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे.महिलांवर अत्याचार वाढले आहे.ड्रग्सचे प्रमाण राज्यात प्रचंड वाढले आहे .अशा प्रकरणात छोट्या लोकांना अटक होते. पण मास्ट्रर माईंड मात्र मोकाट असतात. अमली पदार्थ विकणारे आणि पोलिसांचे हितसंबंध आहेत यातून या घटना वाढत आहे. देवस्थानच्या जमिनीचा घोटाळा मागील अधिवेशनात मांडला. पण काही कारवाई नाही अशी टीका जयंत पाटील यांनी केली. सरकार विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी केवळ टिंगल-टवाळी करत आहे. विरोधकांनी दिलेल्या पत्रातील व्याकरणावर भाष्य करण्यापेक्षा त्यातील प्रत्येक मुद्द्यांवर उत्तर देण्याची जबाबदारी सरकारची आहे,अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली.

**जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची** तयारी नसलेल्या सरकारसोबत औपचारिक चहापानाला उपस्थित राहणे योग्य नसल्याने महाविकास आघाडीने या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. राज्यातील १३ कोटी जनतेच्या हिताचे प्रश्न सोडविणे हे सरकारचे कर्तव्य असून पावसाळी अधिवेशनात हे सर्व मुद्दे महाविकास आघाडी आक्रमकपणे

## एकाच वेळी तब्बल २७२ कर्मचाऱ्यांच्या बदल्या, महापालिका प्रशासनाकडून मोठे फेरबदल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने मोठे फेरबदल केले आहेत. एकाच वेळी तब्बल २७२ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत.नव्याने स्थापन होणाऱ्या दोन क्षेत्रीय कार्यालयांच्या अंमलबजावणीपूर्वी महापालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार, सध्याच्या आठ प्रभाग समित्यांबी पुनर्रचना करून दहा क्षेत्रीय कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. ही नवी रचना १ जुलैपासून प्रत्यक्षात लागू होणार आहे. त्यानुसार विविध विभागांतील कर्मचाऱ्यांना नव्या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये नियुक्त करण्यात आले आहे. नव्या रचनेत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांची नावे देण्यात आली आहेत. त्यामध्ये 'अ' क्षेत्रीय कार्यालय राजगड, 'ब'-सिंहगड, 'क' विजयदुर्ग, 'ड' देवगिरी, 'हैं'-शिवनेरी, 'फ' तोरणा, 'ग' पुरंदर, 'ह' प्रतापगड, 'ज'-रायगड आणि 'ल' लोहगड अशी नावे देण्यात आली आहेत. नवीन 'ज' म्हणजेच रायगड क्षेत्रीय कार्यालय ताथवडे येथील महापालिकेच्या वाहनतळ भवनात कार्यरत राहणार आहे. तर 'ल' म्हणजेच लोहगड क्षेत्रीय कार्यालय संत तुकारामनगर पोलिस ठाण्यासमोरील म्हाडा इमारतीच्या गाळ्यात सुरू करण्यात येणार आहे.

## मान्सून पुन्हा सक्रिय; कोकण, मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** तब्बल १६ दिवसांच्या विश्रांतीनंतर राज्यातील मान्सून पुन्हा सक्रिय झाला असून, पुढील काही दिवसांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. २२ ते २७ जूनदरम्यान या भागांमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला असून, २३ जूनपर्यंत मान्सून पुण्यात दाखल होण्याचा अंदाज आहे.

यंदा राज्यात मान्सूनचे आगमन ५ जून रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाले होते. त्यानंतर ६ आणि ७ जूनदरम्यान त्याने प्रगती करत सोलापूर, हरणाई ते बारामती या पट्ट्यापर्यंत मजल मारली. मात्र, त्यानंतर मान्सूनची वाटचाल थांबली आणि ६ ते २१ जून या कालावधीत राज्यात पावसाने जवळपास १५ ते १६ दिवसांची विश्रांती घेतली. परिणामी, राज्यातील अनेक भागांमध्ये उकाड्याची तीव्रता वाढली होती.



रविवारी (दि. २१ जून) मात्र राज्यातील बहुतांश भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. पुणे शहरासह काही ठिकाणी मान्सूनपूर्व सरींनी हजेरी लावली. पर्वती, कात्रज आणि आसपासच्या भागांत झालेल्या जोरदार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, सध्या बारामती-सोलापूर परिसरात अडखळलेला मान्सून पुढील दोन दिवसांत वेगाने पुढे सरकण्याची शक्यता आहे. त्यामुळे २३ जूनदरम्यान तो पुण्यात दाखल होऊ शकतो. मान्सून सक्रिय झाल्याने कोकण आणि मध्य महाराष्ट्रात २२ ते २७ जूनदरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, मराठवाड्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस अपेक्षित असून विदर्भातील नागरिकांना आणखी काही दिवस उष्णतेचा सामना करावा लागणार आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, विदर्भात २५ जूनपर्यंत उष्णतेची लाट कायम राहू शकते. त्यानंतर २६ जून ते १ जुलैदरम्यान या भागात पावसाची शक्यता आहे.

## पुणे बार असोसिएशनतर्फे शिवाजीनगर जिल्हा न्यायालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** जागतिक योग दिनानिमित्त पुणे बार असोसिएशनच्या वतीने शिवाजीनगर जिल्हा न्यायालय येथे वकील वर्गासाठी विशेष योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. न्यायालयीन कामकाजाच्या धकाधकीच्या वातावरणात वकिलांच्या आरोग्य, मानसिक संतुलन आणि तणावमुक्त जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला.



या कार्यक्रमात सावित्रा खानापुरे, डॉली धेसर तसेच श्रद्धा धनवे यांनी उपस्थित वकील वर्गासाठी योगा सेशन्स घेतले. त्यांनी विविध योगासने, श्वसनक्रिया आणि दैनंदिन जीवनात करता येणाऱ्या सोप्या योगप्रकारांचे मार्गदर्शन केले. नियमित योगाभ्यासामुळे शरीर व मन निरोगी राहते, कामातील एकाग्रता वाढते आणि तणाव कमी होण्यास मदत होते, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राम भुजबळ यांनी योगाचे महत्त्व सांगताना वकिलांनी आपल्या व्यस्त दिनचर्येतून आरोग्यासाठी वेळ काढणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी, संतुलित आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा प्रभावी मार्ग असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपाध्यक्ष ॲड. प्रीतिसिंह परदेशी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सचिव ॲड. नेहा जांभळे सपकाळ यांनी मानले.

या कार्यक्रमास पुणे बार असोसिएशनचे पदाधिकारी उपाध्यक्ष ॲड. प्रताप मोरे, ॲड. कांताराम नप्ते, सचिव ॲड. सम्राट जांभुळकर, ॲड. अभिजित पोळ, खजिनदार ॲड. अंजली बांदल, ऑडिटर ॲड. शिवराज निंबाळकर, ॲड. पूजा पवार तसेच सदस्य ॲड. अनिल हुडे, ॲड. स्मिता वाघमारे, ॲड. गुंजन भोसले आणि पुणे बार असोसिएशनचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे बार असोसिएशनतर्फे राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला वकील वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## देशभरात नीट-यूजी फेरपरीक्षा शांततेत पार

### ५,४४० केंद्रांवर २० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती; सुरक्षा आणि सुविधांवर विशेष भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय चाचणी संस्था (NTA) तर्फे रविवारी घेण्यात आलेली नीट-यूजी (NEET-UG 2026) फेरपरीक्षा देशभरात शांततेत आणि कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत पार पडली. भारतातील ५,४४० परीक्षा केंद्रांसह परदेशातील १४ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेसाठी देश-विदेशातील २० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी हजेरी लावल्याची माहिती एनटीएने दिली.

वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी देशातील सर्वात मोठी आणि स्पर्धात्मक परीक्षा मानल्या जाणाऱ्या नीट-यूजी परीक्षेचे यंदा विशेष महत्त्व होते. परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी एनटीएने यंदा अभूतपूर्व सुरक्षा उपाययोजना राबवल्या. परीक्षा हिंदी, इंग्रजीसह एकूण १३ भाषांमध्ये आयोजित करण्यात आली. देशभरातील विविध राज्यांतील विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या भाषेत परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.

**१० हजारांहून अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांचा सहभाग**

एनटीएच्या माहितीनुसार, यंदाच्या परीक्षेत १० हजारांहून अधिक दिव्यांग (PwD) विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उमेदवारांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, अतिरिक्त वेळ, सहाय्यक लेखक आणि अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. समावेशक आणि सुलभ परीक्षा प्रक्रियेसाठी विशेष प्रयत्न करण्यात आल्याचे एनटीएने स्पष्ट केले.

**कडेकोट सुरक्षा व्यवस्थेची अंमलबजावणी**

पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या पार्श्वभूमीवर यंदा परीक्षा केंद्रांवर अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. सर्व उमेदवारांची आधार-आधारित बायोमेट्रिक पडताळणी, फेस ऑथेंटिकेशन, सीसीटीव्ही देखरेख, मोबाईल सिग्नल जॅमर्स आणि दुहेरी स्तरावरील सुरक्षा तपासणी करण्यात आली. प्रत्येक केंद्रावर परीक्षा प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी विशेष नियंत्रण यंत्रणा कार्यरत होती.

**आजारी विद्यार्थ्यांसाठी विशेष व्यवस्था**

परीक्षेच्या दिवशी आरोग्यविषयक अडचणींचा सामना करणाऱ्या ८१ हून अधिक विद्यार्थ्यांना विशेष सुविधा देण्यात आल्या. काही विद्यार्थ्यांना वैद्यकीय मदत, स्वतंत्र आसनव्यवस्था आणि अतिरिक्त सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे त्यांना कोणत्याही अडथळ्याविना परीक्षा देता आली.

**राज्य सरकारांचे सहकार्य**

परीक्षेदरम्यान उमेदवारांच्या सोयीसाठी विविध राज्य सरकारांनीही सक्रिय सहकार्य केले. अनेक केंद्रांवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सावलीसाठी तंबू, रुग्णवाहिका सेवा, प्राथमिक उपचार सुविधा आणि काही राज्यांत मोफत प्रवासाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली होती. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात आली.

## नीट परीक्षेच्या तणावातून विद्यार्थिनीची आत्महत्या

### हिसारमधील १९ वर्षीय विद्यार्थिनीने पुनर्परीक्षेपूर्वी विष प्राशन केले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हिसार (हरियाणा) :** राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (NEET-UG 2026) पुनर्परीक्षेच्या दिवशी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. हरियाणातील हिसार जिल्ह्यातील १९ वर्षीय विद्यार्थिनीने रविवारी (२१ जून) परीक्षा सुरू होण्याच्या काही तास आधी विष प्राशन करून आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. ही विद्यार्थिनी नीट परीक्षेचा तिसरा प्रयत्न करत होती. यापूर्वी झालेली परीक्षा पेपरफुटीच्या आरोपांमुळे रद्द झाल्यानंतर ती तीव्र मानसिक तणावाखाली होती, अशी माहिती स्थानिक सूत्रांनी दिली.

या घटनेमुळे देशातील स्पर्धा परीक्षांमधील वाढता ताण, विद्यार्थ्यांवरील मानसिक दबाव आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी याविषयी पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

नीट-यूजी २०२६ परीक्षा मूळतः ३ मे २०२६ रोजी घेण्यात आली होती. मात्र, पेपरफुटीच्या आरोपांनंतर राष्ट्रीय परीक्षा संस्था (NTA) आणि केंद्र सरकारने परीक्षा रद्द करून २१ जून रोजी पुनर्परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. देशभरातील सुमारे २२.७५ लाख विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती.

परीक्षा रद्द झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांमध्ये अनिश्चितता आणि मानसिक तणाव वाढल्याचे चित्र समोर आले आहे. पुनर्परीक्षेच्या काही दिवस आधी आणि त्याच दिवशी देशातील विविध राज्यांत नीट परीक्षेशी संबंधित विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. तामिळनाडू, दिल्ली, उत्तराखंड आणि हैदराबाद येथील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांनीही चिंता वाढवली आहे.

## NEET विद्यार्थ्यांच्या गैरसोयीवरून पंतप्रधानांच्या निर्णयावर विरोधकांची टीका; राजीनाम्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : NEET** परीक्षार्थ्यांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली विमानतळावरून आपला प्रस्थान वेळ काही काळ पुढे ढकलल्याची माहिती समोर आली आहे. पंतप्रधानांच्या ताफ्याच्या हालचालींमुळे सुरक्षा कारणास्तव काही मार्गांवर वाहतूक नियंत्रण लागू केले जाते. त्यामुळे परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचण येऊ नये, या उद्देशाने त्यांनी विमानतळावर प्रतीक्षा केल्याचे सांगितले जात आहे.

या निर्णयाचे सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी स्वागत करत पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य दिल्याचा दावा केला आहे. मात्र, विरोधकांनी या कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांच्या मते, NEET परीक्षेशी संबंधित वाद, पेपरफुटीचे आरोप, पुनर्परीक्षेची वेळ आणि विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण या अधिक गंभीर समस्या आहेत. अशा परिस्थितीत केवळ प्रतीकात्मक निर्णय घेण्यापेक्षा सरकारने व्यवस्थेतील त्रुटींची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी विरोधकांकडून करण्यात येत आहे.



काही विरोधी नेत्यांनी तर या संपूर्ण प्रकरणात नैतिक जबाबदारी स्वीकारून संबंधितांनी राजीनामा द्यावा, अशीही भूमिका मांडली आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, या मुद्द्यावरून देशभरात राजकीय चर्चा रंगली असून, सरकार आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. NEET परीक्षेच्या पारदर्शकता, विश्वासार्हता आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण या मुद्द्यांवर व्यापक चर्चा होण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

# मोदी-शाह हे देशाच्या राजनैतिक शक्तीपीठाचे आधारस्तंभ, एकनाथ शिंदे यांचं विधान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इचलकरंजी** : कोल्हापूर हे साडेतीन शक्तिपीठांपैकी एक शक्तिपीठ असले तरी देशाच्या राजनैतिक शक्तीपीठांचा विचार केला तर पहिले शक्तीपीठ म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दुसरे शक्तीपीठ म्हणजे पोलादी पुरुष अमित शाह आहेत. मोदी यांनी भारताला विकासाच्या नव्या उंचीवर नेले, तर अमित शाह यांनी देशाची सुरक्षा आणि सहकार क्षेत्राला नवी दिशा दिली आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

केंद्रीय गृहमंत्री तथा केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन आणि जवाहर सहकारी साखर कारखान्याच्या ''कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना'' या नामविस्तार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर,मंत्री हसन मुश्रीफ, संजय सावकारे, शिवेंद्रराजे भोसले, रवींद्र चव्हाण, माधुरीताई मिसाळ, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, आमदार राहुल आवाडे राजेश क्षीरसागर, माजी आमदार प्रकाश आवाडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, लाडक्या बहिणी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ सहकार नेते कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या कार्याचा गौरव करताना शिंदे म्हणाले की, वयाच्या ९५ व्या वर्षीही त्यांचा उत्साह तरुणांनाही लाजवेल असा आहे. हा केवळ साखर कारखान्याचा कार्यक्रम नसून सहकारातून समृद्धीकडे नेणाऱ्या चळवळीचा उत्सव आहे. शिंदे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र



मोदी गेली बारा वर्षे अखंडपणे देशसेवा करत आहेत. त्यांनी भारताला विकास आणि समृद्धीच्या नव्या उंचीवर नेले असून जगभरात भारताची ताकद वाढवली आहे. देशाच्या राजनैतिक शक्तीपीठातील दुसरे महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे अमित शाह. पोलादी पुरुष, विकास पुरुष, नक्षलवादाचा कर्दनकाळ आणि राजकारणातील चाणक्य अशी त्यांची ओळख आहे. देशातील अंतर्गत सुरक्षा मजबूत करण्याबरोबरच सहकार क्षेत्राला नवे बळ देण्याचे ऐतिहासिक कार्य त्यांनी केले आहे. नक्षलवाद संपविण्याचा त्यांनी निर्धार केला असून ''देशाच्या विकासासाठी आणि जनकल्याणासाठी अमित शाह अहोरात्र काम करत आहेत. सामान्य माणसाला स्वप्न पाहण्यासाठी रात्र कमी पडते, मात्र अमित शाह यांना विकासाची नवी स्वप्ने साकार करण्यासाठी दिवस आणि रात्र दोन्हीही कमी पडतात. देश, समाज आणि सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी ते सातत्याने कार्यरत असतात,'' असे शिंदे म्हणाले.

## संपादकीय

### श्रद्धेचा मुखवटा आणि अंधश्रद्धेचे साम्राज्य

पुण्यात उघडकीस आलेले कथित दैवी अवतार प्रकरण हे केवळ एका स्वयंघोषित गुरूविरोधातील गुन्हेगारी आरोपांचे प्रकरण नाही; ते भारतीय समाजातील अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा आणि विवेकशून्य भक्तीच्या धोकादायक वास्तवाचे प्रतिबिंब आहे. एका उच्चशिक्षित महिलेने केलेल्या गंभीर आरोपांमुळे या प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडवली असून, आता त्याला महत्त्वाचे कायदेशीर वळण मिळाले आहे.

राधामोहन मिश्रा या स्वयंघोषित गुरूवर एका महिलेच्या लैंगिक, मानसिक आणि शारीरिक शोषणाचे आरोप करण्यात आले आहेत. पीडितेच्या तक्रारीनुसार तिला धमक्या देण्यात आल्या, विजेचे धक्के देण्यात आले, मेणबत्त्यांनी भाजण्यात आले आणि तिच्यावर विविध प्रकारचे अत्याचार करण्यात आले. याहून अधिक धक्कादायक बाब म्हणजे, या कथित अत्याचारांना प्रसाद म्हणून स्वीकारण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. जर हे आरोप न्यायालयात सिद्ध झाले, तर तो केवळ एका व्यक्तीचा गुन्हा ठरणार नाही; तर श्रद्धेच्या नावाखाली मानवी स्वातंत्र्य आणि सन्मान कसा हिरावला जाऊ शकतो याचे भयावह उदाहरण ठरेल.

या प्रकरणात पुणे पोलिसांनी सहा महिलांना अटक केली. मात्र या सहा महिलांनी आता मुंबई उच्च न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल केली आहे. त्यांचा दावा आहे की त्यांची अटक बेकायदेशीर आहे. या याचिकेवर २२ जून २०२६ रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे न्यायालयासमोर आता दोन प्रश्न उभे राहतीलपहिला, अटकेची कायदेशीर वैधता आणि दुसरा, मूळ आरोपांचे गांभीर्य.

परंतु या प्रकरणाचा सर्वात महत्त्वाचा पैलू न्यायालयीन नाही; तो सामाजिक आहे. भारतात गेल्या काही दशकांत अनेक स्वयंघोषित गुरू, बाबा आणि आध्यात्मिक नेत्यांविरोधात गंभीर आरोप झाले. काही प्रकरणांत न्यायालयांनी दोषसिद्धीही केली. तरीही समाजातील एका वर्गाची व्यक्तिपूजेची मानसिकता बदलताना दिसत नाही. प्रत्येक वेळी नवा गुरू, नवा चमत्कार आणि नवी भक्तमंडळी निर्माण होताना दिसतात.

विशेष म्हणजे, या प्रकरणातील पीडित महिला उच्चशिक्षित असल्याचे समोर आले आहे. यामुळे अंधश्रद्धा ही केवळ अशिक्षित किंवा ग्रामीण समाजाची समस्या आहे हा समज पुन्हा खोटा ठरतो. शिक्षण माणसाला माहिती देऊ शकते; परंतु विवेक, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित झाली नाही तर उच्च शिक्षणसुद्धा अंधभक्तीपासून संरक्षण देऊ शकत नाही.

या प्रकरणात तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे, तर राज्य सरकारच्या वतीने शासकीय वकील शिशिर हिरे न्यायालयात बाजू मांडणार आहेत. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने आरोपांची सत्यता अद्याप सिद्ध झालेली नाही. त्यामुळे कोणालाही दोषी किंवा निर्दोष ठरविणे योग्य ठरणार नाही. मात्र समाजाने या घटनेकडे केवळ गुन्हेगारी बातमी म्हणून न पाहता एक गंभीर सामाजिक इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे.

खरा प्रश्न राधामोहन मिश्रा कोण आहेत हा नाही; खरा प्रश्न असा आहे की एखादी व्यक्ती स्वतःला दैवी अवतार घोषित करते आणि समाजातील काही लोक ते कोणताही पुरावा न मागता स्वीकारतात कसे? जेव्हा श्रद्धा विवेकावर मात करते, तेव्हा अंधश्रद्धा जन्म घेते. आणि जेव्हा अंधश्रद्धा संघटित स्वरूप धारण करते, तेव्हा व्यक्तीचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि कधीकधी तिचे संपूर्ण आयुष्य धोक्यात येते.

२२ जूनच्या सुनावणीत न्यायालय काय निर्णय देईल हे पुढील काळात स्पष्ट होईल. मात्र या प्रकरणाने आधीच एक महत्त्वाचा संदेश दिला आहेलोकशाही व्यवस्थेत कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा मोठी नाही. अध्यात्माचा आदर केला जाऊ शकतो; पण अध्यात्माच्या नावाखाली प्रश्न विचारण्याचा अधिकार गमावला जाऊ नये. श्रद्धेला विवेकाची जोड नसेल, तर ती सहजपणे शोषणाचे साधन बनू शकते. आणि म्हणूनच, पुण्यातील हे प्रकरण केवळ एका गुरूविरोधातील आरोपांचे प्रकरण नाही; ते आधुनिक भारतातील श्रद्धा, अंधश्रद्धा आणि उत्तरदायित्व यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे.

## उन्हाच्या झळांनी टोमॅटो 'लाल'; इंदापूर तालुक्यात दर प्रतिकिलो ६० रुपयांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इंदापूर** : यंदाच्या तीव्र उन्हाळ्याचा आणि वाढत्या तापमानाचा मोठा फटका टोमॅटो पिकाला बसला असून उत्पादन घटल्याने बाजारातील आवक कमी झाली आहे. परिणामी इंदापूर तालुक्यातील प्रमुख आठवडे बाजारांमध्ये टोमॅटोचा दर प्रतिकिलो सरासरी ६० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. दरवाढीमुळे ग्राहकांचे बजेट कोलमडले असून उत्पादकांनाही उत्पादन घटल्याने अपेक्षित लाभ मिळत नसल्याचे चित्र आहे.

गेल्या काही हंगामात टोमॅटोला मिळालेल्या कमी दरामुळे अनेक शेतकऱ्यांनी लागवडीचे क्षेत्र कमी केले किंवा पर्यायी पिकांकडे मोर्चा वळवला. त्यामुळे यंदा उत्पादनात घट झाली आहे. त्यातच खते, कीटकनाशके, मजुरी आणि वाहतूक खर्च वाढल्याने बाजारभावात वाढ झाली आहे.

इंदापूर तालुक्यात प्रामुख्याने रब्बी हंगामात टोमॅटोची लागवड केली जाते. यंदाच्या खरीप हंगामात सुमारे ६० हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली आहे. जून-जुलै हा टोमॅटोची आवक कमी असण्याचा कालावधी असल्याने मागणीच्या तुलनेत पुरवठा अपुरा पडत असून दर वाढले आहेत.

उष्णतेचा उत्पादनावर मोठा परिणाम

टोमॅटो पिकासाठी १८ ते ३० अंश सेल्सिअस तापमान अनुकूल मानले जाते; मात्र यंदा तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने फुलांचे परागीभवन बाधित झाले. परिणामी फुलगळ वाढून उत्पादनात मोठी घट झाली आहे. तसेच तीव्र सूर्यप्रकाशामुळे फळांवर 'सनस्कॅल्ड'चा प्रादुर्भाव होऊन अनेक टोमॅटो विक्रीयोग्य राहत नसल्याचे दिसून आले आहे.

वाढत्या उष्णतेमुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून झाडांना पाण्याचा ताण बसत आहे. पाने कोमेजणे, पिवळी पडणे तसेच पांढरी माशी व फुलकिड्यांच्या प्रादुर्भावामुळे 'लीफ कर्ल' आणि 'मोझॅक'सारख्या विषाणूजन्य रोगांचा धोका वाढला आहे.

**मल्चिंग व ठिबक सिंचनाचा वापर प्रभावी**

म. फुले कृषी विज्ञान केंद्राचे संचालक राजेंद्र वाघमोडे यांनी सांगितले की, उष्णतेच्या परिस्थितीत जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मल्चिंगचा वापर करणे आवश्यक आहे. ठिबक सिंचनाद्वारे नियमित पाणीपुरवठा करावा. शक्य असल्यास पहाटे किंवा रात्री पाणी देणे अधिक फायदेशीर ठरते. तसेच सावलीसाठी नेट किंवा वाळलेल्या गवताचे आच्छादन केल्यास पिकाचे संरक्षण होऊ शकते.

## जुन्नरमध्ये ट्रकच्या भीषण धडकेत वडिलांसोबत ३ वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : नगर-कल्याण महामार्गावरील ओतूर येथील निमंत्रण हॉटेलजवळ रविवारी (दि. २१) दुपारी सुमारे १२.१६ वाजता भीषण अपघात झाला. मोटारसायकल आणि आयशर ट्रक यांच्यात झालेल्या समोरासमोरच्या जोरदार धडकेत वडील व त्यांच्या तीन वर्षांच्या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तिघेजण जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आळेफाटा येथून कल्याणच्या दिशेने जाणारी एमएच १७ डीडी ३२१५ क्रमांकाची मोटारसायकल आणि कल्याणहून आळेफाट्याकडे येणारा एमएच ०४ एमआर ८८६७ क्रमांकाचा आयशर ट्रक यांच्यात जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की मोटारसायकलवरील पाचही जण दूरवर फेकले गेले. या अपघाताचे थरारक दृश्य सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे.

या दुर्घटनेत अजय बबन दुधवडे (वय २१) आणि अनुजा अजय दुधवडे (वय ३, रा. माळवंदवाडी, घारगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) यांना स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने ॲम्ब्युलन्सद्वारे ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

तर सलोनी अजय दुधवडे, तनुजा अजय दुधवडे (रा. माळवंदवाडी, घारगाव) आणि सुदर्शन गौतम केदार (रा. पांगरीमाथा, ता. जुन्नर) हे तिघेजण जखमी झाले असून त्यांच्यावर आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. रस्त्यावरील वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या प्रकरणी ओतूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## पुणे जिल्हा आरोग्य सेवेच्या शिरपेचात मानाचा तुरा

### खेड मधील १० आरोग्य सेवा उपकेंद्राना दर्जा व गुणवत्तेचे मानांकन जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी** : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्रा कडून (NQAS) झालेल्या सर्व्हेक्षणात खेड तालुक्यातील तब्बल १० आरोग्य उपकेंद्र गुणवत्ता व दर्जात महाराष्ट्रात अव्वल ठरली असल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास माने यांनी सांगितले.

पुणे जिल्हा परिषदेच्या टाकळकरवाडी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास ९४.८० टक्के गुण मिळवुन घवघवीत यश संपादन या पूर्वीचा नामांकन जाहीर झाले असतानाच आता शनिवारी (दि. २०) खेड तालुक्यातील येलवडी, बिबि, कोरेगाव बुद्रुक, औदर, कुरकुंडी, कमान, काळुस, चिंबळी आणि वराळे या गावांतील आरोग्य उपकेंद्राना आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय नवी दिल्ली यांचे कडुन राष्ट्रीय मानांकन जाहीर झाले आहे. हे घवघवीत यश संपादन केल्याने खेडच्या आरोग्य क्षेत्रात दर्जेदार कामगिरी होत असल्याने आरोग्य सेवेच्या विशेष उल्लेखनीय कार्याचे कौतुक होत आहे.

या गुणवत्तेसह ही उपकेंद्र पुणे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासना कडून झालेल्या प्रामाणिक प्रयत्नांचे हे यश आहे. या यशाची दखल पुणे जिल्हा परिषदचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी घेवुन अभिनंदन केले आहे. या मूल्यांकना साठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ विलास माने यांचे विशेष सहकार्य झाले. वैद्यकीय अधिकारी डॉ.इंदिरा पारखे यांनी मार्गदर्शक म्हणून महत्वाची भूमिका बजावली.

## दिघीमध्ये जुन्या वादातून मेव्हण्यावर लाकडी दांडके आणि दगडाने जीवघेणा हल्ला; ३ जणांवर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दिघी** : जुन्या वादाचा राग मनात धरून मेव्हण्याने आपल्या इतर साथीदारांसह मिळून चुलत मेव्हण्याला लाकडी बांबू आणि दगडाने बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना दिघी परिसरातील 'माउंटन व्ह्यु अपार्टमेंट'जवळ घडली आहे. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाले असून, त्यांना जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली आहे.

याप्रकरणी प्रकाश महादेव राठोड (वय ३४, रा. दिघी, पुणे) यांनी दिघी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून अक्षय नामदेव चव्हाण (वय २०), अनुराग नामदेव चव्हाण (वय २२) आणि रेणुका नामदेव चव्हाण (वय २३) यांच्याविरुद्ध भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५२, ३५१(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी यांची बहीण सोडून गेल्याच्या कारणावरून आरोपींच्या मनात राग होता. याच रागातून आरोपींनी फिर्यादी प्रकाश राठोड यांना रस्त्यात गाठून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपी अक्षय याने लाकडी बांबू आणून प्रकाश यांच्या पाठीवर आणि मानेवर जबर मारहाण केली. हा भांडण सोडवण्यासाठी आलेल्या फिर्यादीचा भाचा उमेश राठोड यालाही बांबूने मारहाण करण्यात आली, तसेच रेणुका चव्हाण हिने हाताने मारहाण केली. त्यानंतर आरोपी अनुराग याने रस्त्यावरील मोठा दगड प्रकाश यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. "तुला जिवंत सोडणार नाही, पुण्यात राहू देणार नाही," अशी धमकी देत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंगारे करत आहेत.

## लग्नाचे आमिष दाखवुन तरुणीवर लैंगिक अत्याचार करुन फसवणुक करणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : एकत्र काम करीत असताना लग्नाचे आमिष दाखवुन तरुणीवर लैंगिक अत्याचार करुन फसवणूक करणार्या तरुणावर बावधन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

प्रतिक रामचंद्र गोगावले झअ‍ॅरींळज्ञ ठालहरपवअ‍ॅर त्रेस्रुरश्रश (रा. भुगाव, मुळ रा. गोगलवाडी, ता. भोर) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत एका २७ वर्षाच्या तरुणीने बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडित तरुणी भुगाव येथील एका हॉटेलमध्ये रिस्पेशनिस्ट म्हणून काम करत होती. तिला आई वडील नसल्याने ती एकटी कोथरुडमध्ये रहात होती. हॉटेलमध्ये काम करत असताना प्रतिक गोगावले याच्याशी ओळख झाली. त्याने तू इतक्या लांब राहते, तुला येण्या जाण्याचा त्रास होत असेल, मी तुला भुगाव मध्ये फ्लॅट बघून देतो, असे सांगून त्याने भुगावामध्ये फ्लॅट पाहून दिला. कामावरुन घरी परत येताना उशीर होत असल्याने अनेकदा प्रतिक गोगावले कधी त्याच्या कारमधून तर कधी दुचाकीवर घरी सोडत असे. जून २०२५ मध्ये त्यांनी हॉटेलमध्ये पार्टी केली. त्यावेळी त्याने आग्रह करुन बिअर पिण्यास लावली. त्यानंतर तुला जास्त झाली आहे, घरी सोडतो, असे म्हणून तो घरी घेऊन आला. रात्री उशिरापर्यंत गप्पा मारल्यानंतर तो म्हणाला की इथेच झोपतो. तेव्हा तिने मी येथे एकटी राहते, मला बरोबर वाटत नाही. तेव्हा त्याने तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला. तिने नकार दिल्यानंतरही त्याने मी तुझ्याशीच लग्न करणार आहे, असे बोलून तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शारीरिक संबंध केले. त्यानंतर तो अनेकदा मी तुझ्याबरोबर लग्न करणार आहे, असे सांगून तिच्याबरोबर शारीरिक संबंध ठेवू लागला. फिर्यादी यांना आईवडिल नसल्याने व त्या एकट्या असल्याने तो लग्न करणार असल्याचे गृहित धरुन जोडीदार मिळेल, या उद्देशाने त्या प्रतिकशी बोलू लागल्या. काही दिवस तो तिच्या फ्लटवर राहु लागला. लग्नाबाबत विचारल्यावर घरी सांगितले आहे, असे सांगत होता. तिने विरोध केल्यावर शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन फोटो व्हायरल करुन बदनामी करीन, अशी धमकी देऊ लागला. डिसेंबर २०२५ पर्यंत दोघे तिच्या फ्लॅटवर एकत्र रहात होते. लग्नाबाबत विचारल्यावर उडवा उडवीची उत्तरे देऊ लागला. त्याने मी विचार करुन तुला लग्नाबाबत सांगतो, असे सांगितले. ३१ डिसेंबर २०२५ नंतर त्याने तिच्याकडे राहण्यास येणे बंद केले. कामावर देखील तो अधून मधून येऊ लागला. त्याला फोन केल्यावर तो फोन उचलत नव्हता. काही दिवसांनी तिने प्रतिकला लग्नाबद्दल विचारल्यावर त्याने तुझ्याशी लग्न करायचे नाही, मला मुलीचे घरचे श्रीमंत हवे आहेत, त्याच मुलीशी लग्न करणार आहे, असे बोलून लग्नास नकार दिला. त्यानंतर या तरुणीने बावधन पोलिसांकडे फिर्याद दिली असून पोलीस उपनिरीक्षक शितल गिरी तपास करीत आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये सायबर चोरट्यांचा सुळसुळाट; दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांत नागरिकांना तब्बल १३ लाखांचा गंडा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड** : शहर आणि परिसरात ऑनलाईन फसवणुकीचे सत्र सुरूच असून, सायबर चोरट्यांनी दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये दोन नागरिकांना तब्बल १३ लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेला गंडा घातल्याचे समोर आले आहे. यामध्ये एका महिलेला 'फाईव्ह स्टार हॉटेल रेटिंग'चे आमिष दाखवून, तर दुसऱ्या एका पुरुषाला गॅस सबसिडी अपडेट आणि ओटीपी शेअर न करताही बँक खात्याची माहिती चोरून लुटण्यात आले आहे. याप्रकरणी पिंपरी आणि चिंचवड पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**गुन्हा १: फाईव्ह स्टार हॉटेल रेटिंगचे आमिष, महिलेची २.८७ लाखांची फसवणूक**

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अज्ञात व्यक्तीने महिला फिर्यादीचा विश्वास संपादन केला. ''फाईव्ह स्टार हॉटेल्सना रेटिंग देण्याच्या टास्कमध्ये सहभागी झाल्यास मोठा आर्थिक फायदा होईल,'' असे आमिष चोरट्याने महिलेला दाखवले. त्यानंतर वेगवेगळ्या युपीआय आयडीवर (UPI ID) रक्कम पाठवण्यास सांगून सायबर चोरट्यांनी महिला फिर्यादीची एकूण २,८७,६८१/- रुपयांची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३१८(१), ३१८(२) आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क), ६६(ड) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक पाटील पुढील तपास करत आहेत.

**गुन्हा २: व्हॉट्सअ‍ॅप कॉलवरून बँक हॅक; तब्बल ११.३९ लाख रुपये लंपास!**

दुसरी धक्कादायक घटना चिंचवड येथील गोखले वृंदावन परिसरात घडली आहे. येथील एका पुरुष फिर्यादीला व्हॉट्सअ‍ॅप कॉलद्वारे एका अज्ञात इसमाने संपर्क साधला. आपण 'एमएनजीएल गॅस एजन्सी'मधून बोलत असल्याचे भासवून चोरट्याने फिर्यादीच्या मोबाईलवर एक लिंक पाठवली आणि त्यांचा मोबाईल हॅक केला.

## गेल्या चार महिन्यापासून हा निर्णय शिजत होता, ओमराजे हा चक्रव्यूह कसा भेदणार? सुषमा अंधारेंचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी दिल्लीला जाण्यापूर्वी मेळावा घ्यायला पाहिजे होता. आता जाऊन आले, सह्या दिल्या; हा मेळावा आधी घ्यायला पाहिजे होता. त्यांची मानसिक अस्थिरता आहे. वाय-प्लस सुरक्षा घेतली, याचा अर्थ तुमच्यावर लोकांचा राग आहे. लोक चिडले आहेत. गेल्या चार महिन्यांपासून हा निर्णय शिजत होता. ओमराजे हा चक्रव्यूह कसा भेदणार? असा सवाल उद्धवसेनेच्या सुषमा अंधारे यांनी रविवारी (दि. २१) उपस्थित केला.

त्यांनी २० वर्षे न्यायासाठी लढा दिला आहे. पण त्यांच्या वडिलांच्या खूनप्रकरणी न्याय मिळाला नाही. अनेक गोष्टी घडल्या असतील, मांडणी कमी पडली असेल. त्यांच्यासोबत आमच्या भावना आणि सद्भावना आहेत, असेही त्यांनी सांगितले.



खासदार संजय दिना पाटील यांची कन्या आणि ठाकरे गटाच्या नगरसेविका राजुल पाटील यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरेंची भेट घेतली. त्यावर बोलताना अंधारे म्हणाल्या, ''आम्हाला या लोकांवर विश्वास नाही. त्यांची पोरं आमच्यासोबत राहतील, यावर विश्वास कसा ठेवायचा? खासदारांची पोरं आमच्यासोबत आहेत, या भ्रमात आम्ही नाही. लोकसभा सभापतींसोबत बसलेले, हॉटेलमध्ये झालेल्या बैठकीचे व्हिडिओ आहेत. गेल्या चार महिन्यांपासून हा निर्णय शिजत होता.'' खासदार नागेश आष्टीकर यांच्यासारख्या लोकांची आर्थिक कोंडी झाली आहे. दिल्लीत झालेल्या बैठकीत कोण-कोण होते, हे आम्हाला माहिती आहे. १० तारखेला झालेल्या बैठकीनंतर ताज हॉटेलमध्ये सहा जणांची बैठक झाली; याचे सगळे व्हिडिओ आहेत. आष्टीकर यांनी दिलेली कारणे तकलादू आहेत. मान मिळत नव्हता, मग उमेदवारी कशी मिळाली? असा सवाल अंधारे यांनी केला. ''मला धमक्या येत आहेत. याबाबत मी पोलिसांत तक्रार दिली आहे,'' असेही त्यांनी सांगितले. पवनराजे निंबाळकर हत्या खटल्याचा निकाल निंबाळकर कुटुंबाच्या विरोधात गेला. त्यामुळे खासदार ओमराजे निंबाळकर यांना मोठा धक्का बसला. त्यानंतर ठाकरे गटाकडून ओमराजे निंबाळकर यांची मनधरणी करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. शनिवारी मध्यरात्री उद्धवसेनेचे आमदार कैलास पाटील आणि वरुण सरदेसाई यांनी ओमराजे यांच्या पुण्यातील घरी जाऊन त्यांची भेट घेतली होती. यावेळी या नेत्यांमध्ये तासभर चर्चा झाली होती. त्याचवेळी उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि ओमराजे निंबाळकर यांच्यातही फोनवरून बोलणे झाले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशी) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# "निरोगी आरोग्य व वृद्धत्वासाठी योग" या संकल्पनेवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने ''निरोगी वृद्धत्वासाठी योग'' या यंदाच्या संकल्पनेनुसार आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महानगरपालिकेच्या ११० प्राथमिक व २४ माध्यमिक अशा एकूण १३४ शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक योगाभ्यास करून या उपक्रमात सहभाग नोंदविला.

विशेष बाब म्हणजे, आंतरराष्ट्रीय योग दिन यंदा रविवारी आला असतानाही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने शाळांमध्ये उपस्थिती दर्शविली. सुट्टीचा दिवस असूनही विद्यार्थ्यांनी स्वखुशीने सहभाग नोंदवत योगाबद्दलची जागरूकता आणि उत्साह दाखवून दिला.



योग हा भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा असून शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य जपण्यासाठी तो अत्यंत उपयुक्त आहे. यंदाच्या ''निरोगी वृद्धत्वासाठी योग'' या संकल्पनेतून विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच योगाची सवय निर्माण होऊन आयुष्यभर निरोगी जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश देण्यात आला.

महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सकाळी योग सत्रांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सूर्यनमस्कार, विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यासाचे महत्त्व समजावून सांगत योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, मानसिक ताण कमी होतो, एकाग्रता सुधारते आणि निरोगी जीवन जगण्यास मदत होते, अशी माहिती दिली.

> योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाने नियमित योगाभ्यासाचा संकल्प करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी रविवारीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्याबाबतची जागरूकता दाखविली आहे. विद्यार्थ्यांमध्ये निरोगी जीवनशैलीची सवय रुजविण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासनांचे सादरीकरण केले. अनेक शाळांमध्ये योगविषयक मार्गदर्शन, प्रबोधनपर उपक्रम आणि आरोग्यविषयक चर्चांचे आयोजनही करण्यात आले.

## सारांश वृत्त

### स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून ४४ हजारांचा दंड वसूल

**पिंपरी :** स्वच्छता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात पिंपरी-चिंचवड महापालिकेने धडक कारवाई मोहीम राबवून विविध भागांतून ४४ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभाग आणि ग्रीन मार्शल पथकाने ही मोहीम राबविली. रहाटणी-थेरगाव परिसरात सार्वजनिक रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या टेम्पोवर ५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. तर रावेतमधील एका व्यावसायिक आस्थापनाकडून कचरा जाळल्याचे आढळून आल्याने २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत भाजी मंडई परिसरात विशेष तपासणी मोहीम राबवून प्लास्टिकबंदीचे उल्लंघन, कचरा टाकणे आणि अस्वच्छता करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत १४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला तसेच सुमारे १० किलो बंदी घातलेले प्लास्टिक जप्त करण्यात आले. नागरिकांनी स्वच्छता नियमांचे पालन करून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी केले.

### घरभाड्याच्या वादातून हल्ला; कोयत्याच्या दांड्याने मारहाण, चौघांवर गुन्हा

**पिंपरी :** थेरगाव परिसरात घरभाड्याच्या पैशांच्या वादातून भाडेकरू दाम्पत्यावर मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात घरमालक, त्याचा मुलगा आणि दोन अज्ञात साथीदारांविरोधात काळेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ जून रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास जय हनुमान सुपर मार्केटसमोर, काटे चाळ, श्रीकृष्ण कॉलनी येथे फिर्यादी विकास मधुकर पंडीत (वय २६) यांच्यासोबत घरभाड्याच्या पैशांवरून वाद झाला. यावेळी घरमालक बबन काटे यांनी शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांच्या मुलाने विकास पंडीत यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

मारहाण सुरू असताना फिर्यादीची पत्नी पतीला सोडविण्यासाठी मध्ये आली असता आरोपींनी तिलाही बेदम मारहाण केली. दरम्यान, आरोपीच्या मुलाने हातातील लोखंडी कोयत्याच्या उलट्या बाजूने फिर्यादीच्या डोक्यात वार करून जखमी केले. तसेच एका अज्ञात आरोपीने लाकडी दांडक्याने हातावर मारून दुखापत केली. या हल्ल्यात पती-पत्नी दोघेही जखमी झाले असून काळेवाडी पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या माध्यमातून तरुणांना संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरात ३१ हजार ४८० पेक्षा अधिक इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

या योजनेंतर्गत १८ ते २५ वर्षे वय, भारतीय नागरिकत्व असलेले, किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. पूर्णवेळ नोकरी किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र असतील. जे उमेदवार ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेत आहे ते उमेदवार पात्र आहेत.

इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने असून दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल.

प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेमध्ये पुणे जिल्ह्यामधील ज्युबिलंट फूडवर्क्स लि. (१९२), बजाज ऑटो लि. (३०९), भारत फोर्ज (७), रिलायन्स इंडिस्ट्रीज लि. (३३), टेक महिंद्रा (४२), स्कोडा ऑटो व्होल्क्सवॅगन इंडिया प्रा. लि. (१९), इमामी लि. (१५), फिनोलेक्स केबल्स लि. (६०), कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स इं. प्रा. लि. (१४), पिरामल फार्मा लि. (१) आदी नामांकित कंपन्यांमध्ये रिक्तपदांसाठी उमेदवारांना इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध आहे.

तरी या कंपनीमध्ये अर्ज करण्यासाठी मर्यादित कालावधी असल्यामुळे **https://pminternship.mca.gov.in** या पोर्टलवर जाऊन नोंदणी करावी व या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ पुणे या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. ०२०-२६,१३३६०६, वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पोलिस अधिकारी व अंमलदारांसाठी योग, प्राणायाम व ध्यान सत्राचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**पिंपरी :** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने दिनांक २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन'' उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने पोलीस मुख्यालय, निगडी येथे सकाळी ०६.३० ते ०७.३० या वेळेत पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी विशेष योग, प्राणायाम व ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले.

मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड श्री. विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश पोलीस अधिकारी व अंमलदारांचे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य सुदृढ करणे, तसेच त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे हा होता. समाजसेवेत सातत्याने कार्यरत असलेल्या पोलीस दलावरील ताणतणाव कमी करण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करण्यासाठी या सत्राचा लाभ झाला.

सदर कार्यक्रम कैवल्यधाम, पुणे येथील अनुभवी व अधिकृत योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील एकूण २०९ पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने उपस्थित सर्वांनी नियमित योगाभ्यासाद्वारे शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राखण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमास मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. सारंग आवाड, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२ व ०३, विशेष शाखा व मुख्यालय, तसेच सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. कैवल्यधामचे योग प्रशिक्षक यांनी योग, प्राणायाम व ध्यानाचे महत्त्व तसेच त्याचे आरोग्यदायी फायदे याविषयी मार्गदर्शन केले.

## भरधाव दुचाकीची धडक; पादचाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** भारती विद्यापीठ परिसरातील त्रिमूर्ती चौकात भरधाव दुचाकीच्या धडकेत एका पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

बद्री बिंची (वय ५१) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ते सध्या भारती विद्यापीठ परिसरातील नवीन इमारत लेबर कॅम्पमध्ये वास्तव्यास होते. याप्रकरणी आकाश ज्ञानेश्वर चोरघे (वय २८, रा. मेगा सिटी, कर्वे रस्ता) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मृत बिंची यांचे मेहुणे राजदेव सूधय भारती (वय ४०) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिंची हे बांधकाम क्षेत्रात मजूर म्हणून काम करत होते. घटनेच्या दिवशी ते त्रिमूर्ती चौक परिसरात रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली.

या अपघातात बिंची गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना त्यांची प्रकृती खालावली आणि त्यांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून दुचाकीस्वाराविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक एस. दराडे करत आहेत.

## आषाढी वारीत वारकऱ्यांना असुविधा होता कामा नये; सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करा : जयकुमार गोरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** आगामी आषाढी वारीमध्ये पालखीतील एकाही वारकऱ्याला असुविधा होता कामा नये. त्यानुसार सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून पालखी सोहळा सर्वोत्कृष्ट पद्धतीने कसा होईल, या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराजमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

आषाढी वारीनिमित्त विधानभवन येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पुणे जिल्हा पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल, सोलापूर जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुणे शहर विशेष शाखेचे पोलिस उपायुक्त डॉ. प्रशांत अमृतकर, अतिरिक्त आयुक्त (सामान्य प्रशासन) तुषार ठोंबरे उपस्थित होते.

गोरे म्हणाले, ग्रामविकास विभागाने पालखी सोहळ्यासाठी पहिल्यांदाच गतवर्षीपासून निधीची तरतूद ठेवण्यास सुरुवात केली. यावर्षी पालखीसाठी ७६ कोटी रुपयांना मान्यता दिली आहे. यामुळे आवश्यकतेप्रमाणे सोयी-सुविधा निर्माण करण्यात येत असून त्या दर्जेदार होतील, याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणी जर्मन हँगर, जलरोधक मंडप आदी व्यवस्था केली आहे. त्यामुळे वारकऱ्यांच्या निवाऱ्याची व्यवस्था चांगल्या प्रकारे होईल.

पुलकुंडवार म्हणाले, दरवर्षी आषाढीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांची संख्या वाढत असून यावर्षी ३० लाख विठ्ठलभक्त दर्शनासाठी येऊ शकतील, असा अंदाज आहे. त्यादृष्टीने सर्व मनुष्यबळाने समन्वयाने काम करावे.

तेली म्हणाल्या, पालखीच्या अनुषंगाने दोन्ही पालखी मार्गांची, विसाव्यांची, पालखी मुक्कामाच्या ठिकाणांची पाहणी केली असून त्याबाबत आढावा घेतला आहे. पालखी सोहळ्यादरम्यान पुणे जिल्ह्यात ३४३ ठिकाणी २८ हजार ५००, सातारा जिल्ह्यात ८ हजार व सोलापूर जिल्ह्यात २११ ठिकाणी २९ हजार ५१० शौचालयांची उभारणी होणार आहे. पुणे जिल्ह्यात २८, सातारा जिल्ह्यात ७ व सोलापूर जिल्ह्यात २३ जर्मन हँगर उभारण्यात येणार आहेत. पालखी मार्गावर २२० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाचे ५ हजार ६९८ इतके मनुष्यबळ कार्यरत असणार आहे. दिंडीप्रमुखांना एकूण १० हजार औषधांचे किट वाटप केले आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने तिन्ही जिल्ह्यांत २१ हजार ८२० इतके पोलिस अधिकारी, कर्मचारी मनुष्यबळ कार्यरत राहणार आहे. एकूण सर्व विभागांचे मिळून ५२ हजार ७०६ मनुष्यबळाची नेमणूक केली आहे.

## ओमराजेंच्या घराबाहेर पोलीस बंदोबस्त वाढवला; शिंदेंचे शिवसैनिक जमले, मावळचे खासदार भेटीला पोहचले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष सुटका झाल्यानंतर ओमराजे निंबाळकरांना मोठा धक्का बसला आहे. या निकालानंतर राजकीय हालचालींनाही वेग आला आहे.

ओमराजे निंबाळकर यांनी शिंदेसेनेत जाण्याचा निर्णय बदलल्याचीही चर्चा सुरू झाली आहे. मी अद्याप कुठलाही निर्णय घेतला नाही. २ दिवसांत मतदारसंघातील लोकांची बोलून निर्णय घेईन असं ओमराजेंनी म्हटल्याने त्यांच्या शिंदेसेनेतील प्रवेशावर सस्पेन्स निर्माण झाला आहे. त्यातच आता ओमराजे निंबाळकर यांच्या पुण्यातील घराबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

पुण्यातील ओमराजेंच्या घराबाहेर पोलिसांच्या ५ तुकड्या दाखल झाल्या आहेत. याठिकाणी शिंदेंच्या शिवसेनेचे कार्यकर्तेही जमले आहेत. तब्बल २० वर्षांनी पवनराजे निंबाळकर यांच्या हत्याकांडाचा निकाल लागला. या निकालात आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. त्यामुळे ओमराजेंना धक्का बसला. या निकालामुळे त्यांच्या मनातील



खदखद बाहेर आली आहे. कलियुगात वाईटाला बळ मिळते, चांगल्याला यश मिळत नाही अशी भावना त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर राजकीय भूमिकेबाबत त्यांनी येत्या २ दिवसांत भूमिका घेऊ असं सांगितले आहे. त्यामुळे शिंदेसेनेत जाण्याबाबत ओमराजेंची भूमिका सध्या तळ्यात मळ्यात असल्याचे दिसून येते.

मावळचे खासदार ओमराजेंच्या भेटीला

ओमराजे निंबाळकर पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी पोहचल्यानंतर शिंदेसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे त्यांच्या घरी दाखल झाले. याआधी पुण्यातील शिंदेसेनेचे पदाधिकारी नाना भानगिरे हे ओमराजेंच्या घरी गेले होते. त्यामुळे शिंदेसेनेकडून ओमराजेंचे मन वळवण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरम्यान, ओमराजेंसोबत आमचे संबंध गेल्या २-३ दिवसांपासून खराब झाले असले तरी त्यांच्या मातोश्री गेल्या २० वर्षांपासून न्यायाच्या प्रतिक्षेत होत्या. त्यांना न्याय मिळायला हवा होता. परंतु एका निकालावर राजकीय निर्णय अवलंबून ठेवावा हे एकदा आमदार आणि तीनदा खासदार असलेल्या व्यक्तीला परिपक्व वाटत नाही. सध्या ओमराजे चक्रव्यूहात अडकले आहेत. त्यांना हे चक्रव्यूह भेदू देतील का याबाबत काळजी वाटते असं उद्धवसेनेच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या आहेत.



**दिनांक २० जुन २०२६ रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पिंपरी मोरवाडी न्यायालय येथे राज्यसभा खासदार व सरकारी वकील मुंबई हाय कोर्ट मा. ॲड. उज्ज्वल निकम साहेब यांची मोरवाडी कोर्टात बार रूम मध्ये सदिच्छा भेटीचा प्रसंग व काही क्षणचित्रे*यावेळी अध्यक्ष ॲड. सचिन पानी, महिला सचिव ॲड. संगीता रमेश कुशलकर, सह सचिव ॲड. प्रशांत बचुटे,अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पिंपरी मोरवाडी न्यायालय ॲड. अकोले सर, ॲड. देशमुख सर, ॲड. प्रिया रसाळ, ॲड. सुप्रिया मलशेट्टी, ॲड. जहीर खान,ॲड. पाटील सर, ॲड. सोनवणे सर व इतर वकील वर्ग उपस्थित होते.**

## सारांश वृत्त

### भाड्याच्या वादातून रिक्षाचालकावर हल्ला; डोक्यात दगड मारल्याप्रकरणी प्रवाशावर गुन्हा

**पुणे :** भाड्यावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्याची घटना हडपसर परिसरात घडली. रिक्षाचे भाडे ठरविताना झालेल्या वादातून एका प्रवाशाने रिक्षाचालकाला मारहाण करत त्याच्या डोक्यात दगड मारल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी हडपसर पोलिसांनी आरोपी प्रवाशाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ईश्वर बरोडा पवार (वय ३७, रा. वैदुवाडी, हडपसर) असे जखमी रिक्षाचालकाचे नाव आहे. तर भागवत गुंडाप्पा वाले (वय २५, रा. केशव चौक, माळवाडी, हडपसर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पवार यांनी हडपसर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, १८ जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास ते हडपसर गाडीतळ परिसरात रिक्षासह उभे होते. त्यावेळी आरोपी वाले याने वैदुवाडी येथे जाण्यासाठी रिक्षाचे भाडे किती होईल, याबाबत विचारणा केली. भाड्याच्या रकमेवरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपीने रिक्षाचालकाला शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर जवळील दगड उचलून पवार यांच्या डोक्यात मारल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या हल्ल्यात पवार जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच हडपसर पोलिसांनी तपास सुरू केला.

### राजगडवर पर्यटक दरीत कोसळला; झाडाला अडकल्याने जीव वाचला

**राजगड :** राजगड किल्ला पाहण्यासाठी आलेल्या एका युवक पर्यटकाचा पाय घसरून तो दरीत कोसळल्याची घटना शनिवारी (२० जून) घडली. सुदैवाने तो एका झाडाला अडकल्याने मोठी दुर्घटना टळली. या अपघातात युवक गंभीर जखमी झाला असून आपत्ती व्यवस्थापन विभागाने दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर त्याची सुखरूप सुटका केली.

# हॉरमुझ संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताची तेलखरेदी रणनीती बदलली; रशियाकडून आयातीत मोठी वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील वाढलेल्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने जून २०२६ मध्ये कच्च्या तेलाच्या आयात धोरणात महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. देशांतर्गत ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य देत भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी रशिया आणि युएईकडून तेल खरेदी वाढवली असून, हॉरमुझ सामुद्रधुनीतील अनिश्चिततेचा परिणाम कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

सागरी गुप्तचर संस्था केपलरच्या आकडेवारीनुसार, १ ते १९ जून या कालावधीत भारताची रशियाकडून कच्च्या तेलाची आयात सरासरी २६.६ लाख बॅरल प्रतिदिन इतकी झाली. मे महिन्यात ही आयात १९.१ लाख बॅरल प्रतिदिन होती. त्यामुळे रशिया भारताचा सर्वात मोठा तेलपुरवठादार म्हणून अधिक मजबूत झाला आहे.

युएईकडून जूनमध्ये ६.३६ लाख बॅरल प्रतिदिन तेल आयात करण्यात आले. मे महिन्यातील विक्रमी ६.४४ लाख बॅरल प्रतिदिनच्या तुलनेत ही किंचित कमी असली तरी पुरवठा मोठ्या प्रमाणात स्थिर राहिला आहे. सौदी अरेबियाकडून ३.८४ लाख बॅरल प्रतिदिन, व्हेनेझुएलाकडून २.०९ लाख बॅरल प्रतिदिन आणि अमेरिकेकडून केवळ ९१ हजार बॅरल प्रतिदिन तेल आयात करण्यात आले. विशेष म्हणजे अमेरिकेकडून होणाऱ्या आयातीत मोठी घट झाली असून मे महिन्यात हा आकडा २.५२ लाख बॅरल प्रतिदिन होता.

**हॉरमुझ संकटाचा थेट परिणाम**

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात निर्माण झालेल्या तणावामुळे हॉरमुझ सामुद्रधुनीतील वाहतुकीवर परिणाम झाला होता. जगातील सुमारे




२० टक्के तेलवाहतूक या मार्गातून होते. त्यामुळे या मार्गातील कोणताही अडथळा जागतिक ऊर्जा बाजारासाठी चिंतेचा विषय ठरतो.

युद्धविरामानंतर सामुद्रधुनी हळूहळू पूर्ववत होत असली तरी पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत होण्यासाठी काही आठवडे किंवा महिने लागू शकतात. याच पार्श्वभूमीवर भारताने सुरक्षित आणि पर्यायी स्रोतांकडे अधिक लक्ष केंद्रित केले आहे.

**रशियन तेलाला वाढती पसंती**

रशियाकडून मिळणारे कच्चे तेल जागतिक बाजारभावापेक्षा तुलनेने कमी दरात उपलब्ध होत आहे. याशिवाय हा पुरवठा सुएझ कालवा किंवा केप ऑफ गुड होप मार्गे भारतात येत असल्याने हॉरमुझ सामुद्रधुनीतील संघर्षाचा त्यावर थेट परिणाम होत नाही. त्यामुळे भारतीय रिफायनऱ्यांनी रशियन तेल खरेदीत लक्षणीय वाढ केली आहे.

**युएईचा पर्यायी मार्ग ठरला फायदेशीर**

युएईने हॉरमुझ सामुद्रधुनीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी फुजैराह बंदरापर्यंत पाईपलाईन नेटवर्क विकसित केले आहे. या मार्गामुळे तेलवाहतूक तुलनेने सुरक्षित राहिली आणि भारताला सातत्याने पुरवठा मिळत राहिला. त्यामुळे युएईची भारतातील बाजारपेठेतील भूमिका कायम राहिली आहे.

इंधन दरांवर काय परिणाम होऊ शकतो?

तज्ज्ञांच्या मते, रशियाकडून सवलतीच्या दरात मिळणारे तेल आणि विविध देशांकडून वाढवलेली आयात यामुळे भारतातील पेट्रोल-डिझेलच्या किमतींवर तातडीने मोठा दबाव येण्याची शक्यता कमी आहे. मात्र मध्य पूर्वेतील परिस्थिती पुन्हा बिघडल्यास आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढू शकतात, ज्याचा परिणाम भारतीय इंधन दरांवरही होऊ शकतो.

**भविष्यासाठी भारताची तयारी**

ऊर्जा सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी भारत आता मध्य पूर्वेबरोबरच दक्षिण अमेरिका, अटलांटिक क्षेत्र आणि इतर पर्यायी बाजारांकडून तेल खरेदीचे पर्यायही मजबूत करत आहे. यामुळे भविष्यातील कोणत्याही भू-राजकीय संकटाचा देशाच्या ऊर्जा पुरवठ्यावर कमी परिणाम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने भारताने घेतलेली ही रणनीतिक पावले आगामी काळात देशाच्या तेलपुरवठा व्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणार आहेत.

# आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** जीवनशैलीमध्ये झालेल्या बदलांमुळे सध्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. या आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय आहे. त्यामुळे नियमित योग करून जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या आजारांना दूर ठेवले पाहिजे, अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले.

जुहू बीचवरील फूड कोर्ट जवळ आयोजित १२ व्या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, शिवप्रकाश, केशव उपाध्ये, पवन त्रिपाठी, दीप्ती वायकर, उषा बेन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नियमितपणे योग करणारी व्यक्ती कुठल्याही मानसिक परिस्थितीमध्ये आव्हानांचा यशस्वीपणे सामना करू शकते. त्यामुळे योग विद्येचा अंगीकार, प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. नियमितपणे योग करून आपण आपले शरीर निरोगी व मन प्रसन्न ठेवूया, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

जगभरात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र संघामध्ये भारताने मांडला. संयुक्त राष्ट्र संघाच्या इतिहासात सर्वात कमी कालावधीत आणि कुठलाही विरोध न होता मंजूर झालेला हा प्रस्ताव आहे. भारताने दिलेल्या प्रस्तावानुसार आज जगभरात योग होत आह. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व जगाला पटले आहे. विश्वामध्ये योग विद्या आणि योग चिकित्सेबदल मोठे कुतूहल निर्माण झाले असल्याचेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

व्यक्ती ही केवळ शरीर नसून मन आणि आत्मा सुद्धा असल्याचे अधोरेखित करीत मुख्यमंत्री म्हणाले, माणसाचे मन निसर्गाशी जुळलेले आहे. त्यामुळेच योग विद्येमध्ये केवळ




शरीराचा विचार न करता मन, आत्मा आणि शरीर या तिन्हींचा विचार करण्यात आलेला आहे. योग विद्येमध्ये मनाचा निसर्गातील तत्वांशी असलेला संबंध हा पुनर्जीवित करण्यात येतो. सातत्यपूर्ण योग केल्याचा परिणाम शरीरावर तर होतोच पण मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यावरही होतो.

कार्यक्रम प्रसंगी शिवप्रकाश यांनीही आपले विचार मांडले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपस्थितांनी योगासने केली. कार्यक्रमाला योगशिक्षक, योगोपसक नागरिक उत्साहाने उपस्थित होते.

# मुंबई- वडोदरा महामार्गावर भीषण अपघात; दोघांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई-वडोदरा महामार्गावर रविवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. बदलापूर परिसरात घडलेल्या या अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. तर, जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-वडोदरा महामार्गावर रविवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावरील डिव्हायडरवर आदळली. हा अपघात इतका भीषण होता की, यात आलिशान बीएमडब्लू कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात कारमधील दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, एक जण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या अपघाताची बदलापूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

दरम्यान, फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळी भेट देऊन आवश्यक पुरावे गोळा केले आहेत. वाहनाचा वेग, तांत्रिक बिघाड किंवा मद्यपान यांसारख्या सर्व शक्यतांचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# नऊ बरगड्या मोडलेल्या अवस्थेत विद्यार्थिनीने दिली NEET-UG पुनर्परीक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** गंभीर रस्ते अपघातात नऊ बरगड्या मोडून फुफ्फुसांना दुखापत झाल्यानंतरही वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न न सोडणाऱ्या कोलकात्यातील सृष्टी दुबे या विद्यार्थिनीने रविवारी झालेली NEET-UG 2026 पुनर्परीक्षा दिली. तिच्या जिद्दीची आणि चिकाटीची देशभरात चर्चा होत असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्तक्षेपानंतर राष्ट्रीय चाचणी संस्था (NTA) आणि परीक्षा केंद्र प्रशासनाने तिच्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या.

सृष्टी दुबे ही वैद्यकीय शिक्षणासाठी NEET-UG परीक्षा देत होती. परीक्षेच्या काही दिवसांपूर्वी झालेल्या गंभीर रस्ते अपघातात तिच्या नऊ बरगड्या मोडल्या होत्या. तसेच फुफ्फुसांना गंभीर दुखापत झाल्याने तिच्यावर मोठी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. उपचारादरम्यान तिला व्हेंटिलेटरची मदतही घ्यावी लागली होती. अशा परिस्थितीतही तिने परीक्षा देण्याचा निर्धार कायम ठेवला.

या घटनेची माहिती केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय चाचणी संस्थेला विद्यार्थिनीला शक्य ती सर्व मदत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार कोलकात्यातील ढकुरिया येथील बिनोदिनी गर्ल्स हायस्कूल या परीक्षा केंद्रात तिच्यासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित व्यवस्था करण्यात आली.

**विशेष सुविधांची व्यवस्था**

एनटीए आणि परीक्षा केंद्र प्रशासनाने सृष्टीसाठी तळमजल्यावर स्वतंत्र खोली उपलब्ध करून दिली. तिच्या आरोग्याची स्थिती लक्षात घेऊन तिला छातीतील द्रव बाहेर काढण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चेस्ट ड्रेन उपकरणासह परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली.

तसेच, आयएलएस हॉस्पिटल येथील डॉक्टर आणि पॅरामेडिक्सची विशेष टीम संपूर्ण परीक्षेदरम्यान तिच्यासोबत उपस्थित होती.

# बालभारतीच्या पुस्तकात फुले दाम्पत्याने सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेविषयी चुकीचा उल्लेख

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात सुरू केलेल्या मुलींच्या शाळेचा उल्लेख बालभारतीच्या पुस्तकात 'महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा' असा करण्यात आला आहे. मात्र, महाराष्ट्र शासनाच्या ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये, स्मारकांवरील नोंदींमध्ये तसेच विविध संदर्भग्रंथांमध्ये या शाळेचा उल्लेख 'देशातील पहिली मुलींची शाळा' असा करण्यात आलेला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. बालभारतीच्या इयत्ता तिसरीच्या 'आपल्या सभोवतालचे जग - भाग २' या पाठ्यपुस्तकातील भिडेवाड्यातील मुलींच्या शाळेबाबतचा उल्लेख दुरुस्त करावा, अशी मागणी बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांच्याकडे करण्यात आली आहे. पुस्तकातील उल्लेख हा ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचा असून, त्यामुळे फुले दाम्पत्याच्या कार्याची उंची कमी होत असल्याचा आरोप शिक्षक विजय वडवेराव यांनी निवेदनाद्वारे केला आहे. तसेच या चुकीच्या माहितीद्वारे शिक्षक, विद्यार्थी आणि समाजाची दिशाभूल होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

> या संदर्भात बालभारतीमध्ये आम्हाला पत्र प्राप्त झालं आहे. आमची समिती त्यावर पूर्ण अभ्यास करेल. हा प्रश्न संचालक यांच्याकडे आहे. धनंजय कीर यांच्या पुस्तकातून उल्लेख असा केला आहे. हे पत्र समिती पुढे ठेवून त्यावर काम करू.
>
> **- प्रा.डॉ. गणेश राऊत, अध्यक्ष, इयत्ता तिसरी ते पाचवी इतिहास समिती, बालभारती**

बालभारतीने या बाबीची गंभीर दखल घेऊन पाठ्यपुस्तकातील माहितीची पडताळणी करावी आणि वास्तव व ऐतिहासिक सत्याशी सुसंगत असा आवश्यक बदल करावा, अशी मागणी होत आहे. या संदर्भात 'लोकमत'ने बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओके यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. प्रत्यक्ष बालभारती येथे जाऊन संचालिका अनुराधा ओक व इयत्ता तिसरी ते पाचवीचे इतिहास समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ गणेश राऊत, तसेच इतिहास व राज्यशास्त्राच्या प्र. विशेषाधिकारी वर्षा सरोदे यांची भेट घेऊन पाठ्यपुस्तकातील ही चूक त्यांच्या निदर्शनास आणून दिली. भिडेवाड्यात महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या शाळेचा इतिहास देशातील पहिल्या मुलींच्या शाळेचा म्हणून सर्वत्र नोंदलेला असताना बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात तिचा उल्लेख 'महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा' असा करणे चुकीचे व दिशाभूल करणारे आहे.

# हरमनप्रीत कौरचा वर्ल्ड रेकॉर्ड! महिला-पुरूष टी-२० इतिहासात अशी कामगिरी ठरली जगातील एकमेव खेळाडू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लंडन :** महिला टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये आज २१ जूनला भारत आणि दक्षिण आफ्रिका महिला संघ भिडत आहेत. हा सामना मॅनचेस्टरच्या एमिरेट्स ओल्ड ट्रॅफर्ड हा सामना खेळवला जात आहे. सुरूवातीचे दोन सामने जिंकत मजबूत स्थितीत असलेल्या भारतीय संघाच्या नजरा या सामन्यातही विजयावर असतील. त्यामुळे विश्वचषकात विजयाची हॅटट्रिक लगावण्यावर भारताच्या नजरा असणार आहेत. यासह या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौरने इतिहास घडवला आहे. यादरम्यान आता भारताच्या महिला



संघाला आयसीसी विश्वचषक जिंकून देणारी पहिली कर्णधार हरमनप्रीत कौरने हा सामना खेळण्यासाठी उतरताच इतिहास घडवला. हरमनप्रीत कौरचा हा कारकिर्दीतील २०० वा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना आहे. यासह पुरूष आणि महिला क्रिकेटमध्ये २०० टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी ती जगातील एकमेव खेळाडू ठरली आहे. पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक सामने खेळण्याचा विक्रम आयर्लंडच्या पॉल स्टर्लिंगच्या नावावर आहे, ज्याने १६३ सामने खेळले आहेत. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील कर्णधार हरमनप्रीत कौरची कामगिरी कशी राहिली आहे, पाहूया. हरमनने १९९ सामन्यांमधील १७८ डावांमध्ये ४,१२३ धावा केल्या आहेत. यादरम्यान तिची सरासरी ३०.०९ इतकी राहिली आहे. या फॉरमॅटमध्ये हरमनने १७ अर्धशतकं आणि एक शतक झळकावलं असून, तिची सर्वोच्च धावसंख्या १०३ धावा आहे. महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत भारताची हरमनप्रीत कौर तिसऱ्या स्थानावर आहे.

# फायनलमध्ये वैभव सूर्यवंशीची विक्रमी खेळी! भारताने उंचावली तिरंगी मालिकेची ट्रॉफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दाम्बुला :** श्रीलंकेतील दाम्बुलाच्या मैदानात खेळवण्यात आलेल्या तिरंगी मालिकेतील फायनलमध्ये यजमान श्रीलंकेचा करेक्ट कार्यक्रम केला. या मालिकेत सपशेल अपयशी ठरलेल्या वैभव सूर्यवंशीने ट्रॉफीसाठीच्या लढतीत विक्रमी खेळी साकारली. पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय 'अ' संघाने वैभव सूर्यवंशीच्या २९ चेंडूतील९४ धावांच्या खेळीच्या जोरावर निर्धारित ५० षटकांत ९ बाद ३७७ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंका 'अ' संघाचा डाव ३११ धावांवर आटोपला. भारतीय संघाने ६६ धावांनी सामना जिंकत ट्रॉफीवर नाव कोरले.

वैभव सूर्यवंशीची विक्रमी खेळी

दाम्बुलाच्या मैदानातील अंतिम सामन्यात यजमान श्रीलंकेच्या संगाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशीने तुफान फटकेबाजीचा नजराणा पेश करताना त्याचा हा निर्णय वर्थ ठरवला. अवघ्या ११ चेंडूत अर्धशतक झळकावल्यावर वैभव सूर्यवंशी लिस्ट ए क्रिकेटमधील जलद शतकी विक्रमाच्या अगदी उंबरठ्यावर पोहचला अन् त्याने विकेट गमावली. त्याचे शतक अवघ्या ६ धावांनी हुकले. पण २९ चेंडूतल ९४ धावांच्या खेळीसह त्याने श्रीलंकेच्या संघाला बॅकफूटवर ढकलले. त्याच्याशिवाय कर्णधार तिलक वर्मनं संयमी खेळी करताना ९० चेंडूत ६७ धावा तर उप कर्णधार ऋतुराज गायकवाडने ५१ चेंडूत ४०धावांची उपयुक्त खेळी केली. अखेरच्या षटकात विपराजनिकमन याने २० चेंडूत केलेल्या २७ धावा आणि अनुकूल रॉयच्या १५ चेंडूतील ३९ धावांच्या खेळीच्या जोरावर भारतीय संघाने निर्धारित ५० षटकांत ३७७ धावा करत श्रीलंकेसमोर ३७८ धावांचे लक्ष्य ठेवले होते.

**डोंगराऐवढ्या धावसंख्येचा पाठलाग करताना दोघांनी अर्धशतके ठोकली, पण...**

मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या संघाची सुरुवात खराब झाली. यश ठाकूरनं यजमानांना धक्क्यावर धक्के देत टीम इंडियाला दमदार सुरुवात करुन दिली. अवघ्या २५ धावांवर सलामीवीर निरोशान डिक्केलाने तंबूचा रस्ता धरला. अविष्का फर्नांडो ३ (३) आणि नुवानिंदू फर्नांडो २१ (२१)



दोघेही यशच्या गोलंदाजीवर बाद झाले. संघ अडचणीत असताना सदिरा समरविक्रमा याने अर्धशतक झळकाले. पण ४४ चेंडूत ५२ धावांवर अशोक शर्माने त्याच्या खेळीला ब्रेक लावला. त्याच्याशिवाय वानुजा सहान याने अर्धशतकी खेळी साकारली. पण घरच्या मैदानावर शेवटी श्रीलंकेला पराभवाचा सामना करावा लागला. टीम इंडियाकडून गोलंदाजीत यश ठाकूर आणि विराज निगम यांनी प्रत्येकी ३-३ तर अनुकूल रॉय २ तर तिलक वर्मा आणि अशोक शर्मानं प्रत्येकी १-१ विकेट आपल्या खात्यात जमा केली.

**आज वैभव सूर्यवंशी खेळला नसता तर...; 'श्रीलंका अ'ने ३०० चा टप्पा पार केला**

क्रिकेट जगतात सध्या ज्या एका नावाचा प्रचंड दबदबा पाहायला मिळत आहे, ते नाव म्हणजेच भारताचा १५ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशी! त्रिकोणी मालिकेच्या अंतिम सामन्यात श्रीलंका 'अ' विरुद्ध फलंदाजी करताना वैभवने ५० षटकांच्या क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतक ठोकण्याचा २० वर्षे जुना वर्ल्ड रेकॉर्ड मोडीत काढला आहे.

वैभवच्या २९ चेंडूतील ९४ धावांच्या वादळी खेळीच्या जोरावर भारत 'अ' संघाने ५० षटकांत ३७७ धावांचा महाकाय डोंगर उभा केला आणि श्रीलंकेला ३११ धावांत गुंडाळत जेतेपदावर नाव कोरले. आज जर वैभव सूर्यवंशी खेळलाच नसता तर भारताला हा सामना जिंकणे अवघड गेले असते.

अंतिम सामन्यात सलामीला आलेल्या वैभव सूर्यवंशीने मैदानावर उतरताच श्रीलंकेच्या गोलंदाजांची पिसं काढली. त्याने अवघ्या ११ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. ५० षटकांच्या क्रिकेटच्या फॉर्मेटमध्ये हा आतापर्यंतचा सर्वात वेगवान अर्धशतकाचा जागतिक विक्रम ठरला आहे. वैभवने २९ चेंडूंचा सामना करताना तब्बल ९४ धावांची खेळी केली. त्याचे शतक अवघ्या ६ धावांनी हुकले असले, तरी त्याच्या या इम्पॅक्ट इनिंगने सामन्याचा नूरच बदलून टाकला.

वैभवच्या या वादळी सुरुवातीनंतर कर्णधार तिलक वर्माने ६७ धावांची संयमी आणि महत्त्वपूर्ण खेळी केली. याशिवाय ऋतुराज गायकवाडने ४०, प्रियांश आर्याने ३९, अनुकूल रॉयने १५ चेंडूत ३९ आणि कुमार कुशाग्रने ३६ धावांचे योगदान दिले. या सांघिक कामगिरीच्या जोरावर भारत 'अ' संघाने ९ बाद ३७७ धावांचा डोंगर उभा केला आणि श्रीलंकेसमोर ३७८ धावांचे कठीण लक्ष्य ठेवले.